फडणवीस यांनी मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही सर्वांना देशभरातल्या विविध सणांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

जम्मू आणि काश्मीरमध्ये राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेवरून भारतीय सीमेत घुसखोरी करणारे पाकिस्तानी ड्रोन्स नष्ट करण्यासाठी भारतीय लष्कराने गोळीबार केला. काल संध्याकाळी सातच्या सुमाराला राजौरीत चिंगस या भागात हे ड्रोन घिरट्या घालताना आढळले. त्यांच्यावर लष्कराने गोळीबार केल्यानंतर ते तिथून निघून गेले. मात्र, या भागाच्या दुसऱ्या टोकाला पुन्हा काही ड्रोन घिरट्या घालताना आढळले. या ड्रोन्सनी कुठलाही अंमली पदार्थ किंवा शस्त्रं भारतीय हद्दीत टाकली आहेत का, याचा शोध घेण्यात येत आहे.

<><><><><>

अमेरिकेच्या देशांतरण आणि सीमाशुल्क विभागानं भारतीय नागरिकांना ताब्यात घेणं बेकायदा असल्याचा निर्वाळा अमेरिकेच्या विविध ठिकाणच्या न्यायालयांनी दिला आहे. कॅलिफोर्निया, मिशिगन आणि पेनसिल्वेनिया इथल्या न्यायालयांनी याच महिन्यात दिलेल्या निकालांमध्ये या भारतीय नागरिकांना सोडून देण्याचे आणि त्यांच्या जामिनावर तत्काळ सुनावणी घ्यायचे आदेश देशांतरण आणि सीमाशुल्क विभागाला दिले आहेत. आधीपासूनच अमेरिकेत राहात असलेल्यांना जबरदस्ती ताब्यात घेण्याच्या सरकारच्या धोरणाला या न्यायालयांनी विरोध केला आहे. अशा नागरिकांना निव्वळ कागदपत्रं नाहीत म्हणून ताब्यात घेण्याच्या सूचना सरकारनं देशांतरण आणि सीमाशुल्क विभागाला दिले होते, या धोरणावरही न्यायालयांनी टीका केली आहे.

<><><><><>

माली देशात नाजयर नदीत एक बोट खडकांना धडकून झालेल्या अपघातात ३८ जणांचा मृत्यू झाला, तर २३ जणांना वाचवण्यात यश आलं. शेतकरी आणि काही कुटुंबांना घेऊन जाणाऱ्या या बोटीनं बंदी असूनही रात्रीच्या वेळी किनाऱ्यावर यायचा प्रयत्न केला आणि खडकाला धडकून ती बुडाली.

<><><><><>

थायलंडमध्ये प्रवासी रेल्वेवर क्रेन कोसळून किमान २२ जण ठार झाले, तर इतर ६४ जण जखमी झाले. ही क्रेन चालत्या रेल्वेवर कोसळल्यामुळे रेल्वे रुळांवरून घसरली आणि तिला आग लागली. ही आग आटोक्यात आणल्याची आणि रेल्वेमध्ये अडकलेल्यांना बाहेर काढायचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली आहे. या ट्रेनमध्ये १९५ प्रवासी असल्याचं थायलंडच्या दळणवळण मंत्र्यांनी सांगितलं. या प्रकरणाची चौकशी करायचे आदेश दिल्याचंही ते म्हणाले.

<><><><><>

इराणमध्ये सरकारविरोधी आंदोलनादरम्यान बळी पडलेल्यांची संख्या किमान २ हजार ५७१ वर गेली आहे. अमेरिकेच्या मानवाधिकार कार्यकर्त्यांनी दिली आहे. मृत्यूमुखी पडलेल्यांपैकी २ हजार ४०३ जण आंदोलक असून १४७ जण सरकारशी संबंधित असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. यात १२ लहान मुलांचा आणि आंदोलनात सहभागी नसलेल्या ९ नागरिकांचाही समावेश आहे. या संघर्षादरम्यान १८ हजारापेक्षा जास्त जणांना ताब्यात घेतल्याचंही कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे.

दरम्यान, इराणनं जर आंदोलकांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली, तर अमेरिका ताकदीनं प्रत्युत्तर देईल, असा इशारा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही अटकेत असलेल्या आंदोलकांवर जलदगती

न्यायालयात खटले चालवून त्यांना मृत्यूदंड देण्याचे संकेत इराणच्या न्यायव्यवस्थेनं दिले आहेत. गेल्या आठवड्यात अटक केलेला आंदोलक एरफान सोलतानी याला आजच मृत्यूदंड देणार असल्याची माहिती इराणच्या मानवाधिकार संस्थेनं त्याच्या कुटुंबीयांच्या हवाल्यानं दिली आहे.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेतला दुसरा सामना राजकोटमध्ये सुरू आहे. यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे. जखमी वॉशिंग्टन सुंदरच्या भारतानं नितीश कुमार रेड्डीला संघात स्थान दिलं आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारतानं पहिल्या षटकांत एकही गडी न गमावता एकही धाव केली नव्हती.

मालिकेतला पहिला सामना जिंकून भारत १-०नं आघाडीवर आहे. आजचा सामना जिंकून ही मालिका जिंकण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्ष इम्यॅन्युएल मॅक्रॉन यांचे राजनैतिक सल्लागार इम्यॅन्युएल बोन्ने यांच्यामध्ये काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. भारत-फ्रान्सदरम्यान विविध क्षेत्रांमध्ये बळकट आणि विश्वासार्ह धोरणात्मक भागीदारी असल्याचा पुनरुच्चार या चर्चेनंतर प्रधानमंत्र्यांनी केला आहे. या चर्चेत महत्त्वाच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही दृष्टीकोनांची देवाणघेवाण झाल्याचंही ते म्हणाले.

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांच्यात काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. व्यापार, अत्यावश्यक खनिजे,

